# स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, विष्णुपूरी, नांदेड-४३१ ६०६

## निविदा क.: संपदा/उपहारगृह/निविदा क.०१-२०२५

## विद्यापीठ परिसरातील प्रशासकीय इमारती समोरील जीण्या खालील उपहारगृह भाडे तत्वावर चालविण्यासाठी निविदा सूचना

### "निविदा पुस्तिका"

| | | |
|---|---|---|
| १) कामाचे नांव | : | वर्ष २०२५-२०२७ करिता विद्यापीठ परिसरातील प्रशासकीय इमारती समोरील जीण्या खालील उपहारगृह भाडे तत्वावर चालविण्यासाठी निविदा |
| २) निविदाधारकाचे नांव | : | ------------------------------------------ |
| ३) पावती क्रमांक | : | ------------------------------------------ |
| ४) दिनांक | : | ------------------------------------------ |
| ५) को-या निविदा पुस्तीकेची किंमत | : | **रू.१,९००/-** |
| ६) अनामत रक्कम | : | **रु.९,५००/-** |

**अधिका-याची स्वाक्षरी**

# :: अनुक्रमणिका ::


| अ.क्र. | तपशिल | पृष्ठ क्रमांक |
|---|---|---|
| १. | निविदा सूचना | ०३ |
| ०२. | उपाहारगृह निविदा सूचना | ०४-०४ |
| ०३. | सर्वसाधारण नियम व अटी | ०५-०८ |
| ०४. | घोषणापत्र निविदाधारकांचा संपर्कासाठी पत्ता | ०९ |
| ०५. | परिशिष्ट 'अ'(माहिती भरावी) | १० -११ |

# स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ

**'ज्ञानतीर्थ' विष्णुपूरी, नांदेड**

**निविदा क्र.संपदा/प्रशासकीय इमारतीसमोरी जीन्याखालील उपहारगृह/निविदा क्र.०१-२०२५**

## जाहीर निविदा सूचना

कुलसचिव स्वा.रा.ती म.विद्यापीठ, नांदेड हे **"वर्ष २०२५-२०२७ करिता विद्यापीठ परिसरातील प्रशासकीय इमारती समोरील जीण्या खालील उपहारगृह भाडे तत्वावर चालविणे बाबत"** परवानाधारकाकडून जाहिर निविदा मागवित आहेत. त्यासाठी इच्छुक निविदाधारकांनी निविदा पुस्तिका विद्यापीठाच्या वेबसाईट **www.srtmun.ac.in** वरुन **दि.२९/०७/२०२५ ते दि.१२/०८/२०२५ पर्यंत** डाउनलोड करता येईल. त्यासाठी निविदा शुल्क **रु.१९००/-** चा धनाकर्ष किंवा लेखा विभागात रोखीने जमा करुन पावती निविदे सोबत जोडणे आवश्यक आहे. तसेच भरलेली सिलबंद निविदा **दि.१२/०८/२०२५** पर्यंत सांयकाळी ५.०० वाजेपर्यंत आवश्यक कागदपत्रासह संपदा विभागात सादर करावी. उशिरा आलेल्या निविदा स्विकारल्या जाणार नाहीत. निविदेतील दुरुस्ती/बदल केवळ विद्यापीठ संकेतस्थळावरच उपलब्ध असेल. तसेच कोणतीही निविदा मंजूर अथवा नामंजूर करण्याचा अधिकार विद्यापीठाने राखून ठेवला आहे.

संदर्भ : संपदा/प्र.इ.उपहारगृह/ निविदा क्र.०१-२०२५/157

दिनांक 28/07/२०२५

कुलसचिव

कुलसचिव
स्वामी रामानंद तीर्थ
मराठवाडा विद्यापीठ नांदेड

प्रत:

१) जनसंपर्क अधिकारी, प्रस्तुत विद्यापीठ यांना प्रत देउन कळविण्यात येते की, सदर निविदा सूचना **" गोदातीर समाचार (स्थानिक)'** या वर्तमानपत्रात प्रसिध्द करावी.

२) सिस्टम एक्सपर्ट, संगणक कक्ष, प्रस्तुत विद्यापीठ यांना प्रत देउन कळविण्यात येते की, सदर निविदापुस्तिका विद्यापीठ संकेतस्थळावर प्रसिध्द करावी.

३) सूचना फलक, प्रशासकिय इमारत, प्रस्तुत विद्यापीठ

४) सूचना फलक, संपदा विभाग, प्रस्तुत विद्यापीठ

# उपाहारगृह निविदा सूचना

कुलसचिव, स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड हे **'' २०२५-२७ करिता विद्यापीठ परिसरातील प्रशासकीय इमारती समोरील जीण्या खालील उपहारगृह भाडे तत्वावर चालविणे बाबत''** इच्छुकांकडुन निविदा मागवित आहेत. इतर माहिती खालील प्रमाणे देण्यात येत आहे.

०१. **'' वर्ष २०२५ -२०२७ करिता विद्यापीठ परिसरातील प्रशासकीय इमारती समोरील जीण्या खालील उपहारगृह भाडे तत्वावर चालविणे बाबत ''** असा स्पष्ट उल्लेख पाकिटावर करावा.

०२. **निविदा सादर करण्याची पध्दत**:- पुरवठाधारकांनी खालील दोन सीलबंद लिफाफे सादर करावयाचे आहेत. लिफाफा क्रं.-०१ वर **'' वर्ष २०२५ -२०२७ करिता विद्यापीठ परिसरातील प्रशासकीय इमारती समोरील जीण्या खालील उपहारगृह भाडे तत्वावर यासाठीची निविदा'** असे स्पष्ट नमूद केलेले असावे आणि या लिफाफयामध्ये खालील प्रमाणे मुळ धनाकर्ष व इतर कागदपत्राची सत्य प्रत जोडावी.

१) **निविदा शुल्क रु.१९००/- (नापरतावा) व रू.९,५००/- चा अनामत रक्कम लेखा विभागात रोखीने जमा करुन पावती किंवा सदर रक्कमेचा वेगवेगल्या राष्ट्रीयकृत बँकेचा धनाकर्ष 'वित्त व लेखा अधिकारी', स्वा.रा.ती.म. विद्यापीठ, नांदेड यांचे नावे (नांदेड येथे अदा होण्यासाठी) असावा.** तो न जोडल्यास निविदा विचारात घेतली जाणार नाही.

२) शॉप-अॅक्ट अंतर्गत नोदंणी (अद्यावत नुतनीकरणासह व ज्यामध्ये भोजनालय/हॉटेल चा उल्लेख असावा) प्रमाणपत्र.

३) अन्न सुरक्षा व मानके कायदा-२००६ अंतर्गत अन्न व्यवसायिक नोंदणी (अद्यावत नुतनीकरणासह व ज्यामध्ये भोजनालय/हॉटेल चा उल्लेख असावा) प्रमाणपत्र असणे आवश्यक आहे.

४) जीएसटी नोंदणी क्रमांक.

५) पॅन कार्ड झेरॉक्स प्रत जोडावी(पॅन कार्ड आधार कार्डशी (**Link**) जोडलेले असावे).

६) आधार कार्ड झेरॉक्स प्रत जोडावी.

७) घोषणापत्र.

८) उपहारगृह चालविण्याचा तीन वर्षाचा अनुभव व मागील ३ वर्षाचे सनदी लेखापालांनी प्रमाणीत केलेले उलाढाल प्रमाण पत्र जोडावे असणे आवश्यक आहे.

**लिफाफा क्रं.-०२:-** वर **'' वर्ष २०२५-२०२७ करिता विद्यापीठ परिसरातील प्रशासकीय इमारती समोरील जीण्या खालील उपहारगृह भाडे तत्वावर चालविणे '' बाबत वित्तीय लिफाफा क्रं.०२''** 'असे स्पष्ट नमूद केलेले असावे आणि या लिफाफ्यात फक्त दर भरलेली निवीदा (परिशिष्ट-''अ'' मध्ये ) असावी.

०३. भरलेली निविदा मा.वित्त व लेखाधिकारी यांच्या कक्षात ठेवण्यात आलेल्या बंद पेटीत **दि.१२/०८/२०२५** रोजी सांयकाळी ५.०० वाजे पर्यंत टाकावे. उशिरा आलेल्या निविदा स्वकारली जाणार नाही.

०४. कोणतीही निविदा मंजूर अथवा सर्व निविदा नामंजूर करण्याचा अधिकार विद्यापीठाने राखून ठेवला आहे.

०५. प्रत्येक उपहारगृहासाठी वेग वेगळया निविदा शुल्क व अनामत रक्कम भरणे आवश्यक आहे. अन्यथा निविदा अपात्र करण्यात येईल.

कुलसचिव

कुलसचिव
स्वामी रामानंद तीर्थ
मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

## निविदाधारकांसाठी सर्वसाधारण नियम व अटी

१) **"विद्यापीठ परिसरातील वर्ष २०२५-२०२७ करीता विद्यापीठ परिसरातील प्रशासकीय इमारती समोरील जीण्या खालील उपहारगृह भाडे तत्वावर चालविणे यासाठीची निविदा"** भाडे तत्वावर चालविण्यासाठी करावयाचा करार हा मा.व्यवस्थापन परिषद दि.२३/१२/२०२३ विषय क्र.०५/९४-२०२३ च्या **ब)** ठरावनुसार **२ वर्ष** या कालावधीसाठी असेल, तसेच जर खाद्यपदार्थाचा दर्जा तथा उपहारगृहतील सर्व्हीसेस/सोईसुविधा व्यवस्थित आसतील तर ०१ वर्ष अतिरिक्त मुदत वाढ देण्यात येईल. तथापी उपहारगृह चालकाच्या अंन्नपदार्था बाबत अथवा इतर बाबतीत काही तक्रार आल्यास व त्या विद्यापीठास योग्य वाटल्यास करार रद्दकरण्याचा व उपहारगृह चालकावर दंडात्मक कार्यवाही करण्याचा अधिकार विद्यापीठास असेल.

२) उपाहारगृहा करीता २४ तास पाणी पुरवठा विद्यापीठातर्फे केला जाईल. तसेच उपहारगृहचालकास पिण्याचे पाण्याची व्यवस्था **(RO+ UV)** उन्हाळ्या मध्ये थंड पानी पिण्यासाठी स्वखर्चाने करावी लागेल.

३) उपाहारगृहासाठी विद्युत पुरवठा हा वेगळे मिटर बसवून देण्यात येईल. मात्र विद्युत देयके ही उपाहारगृह चालविणा-या उपहारगृहचालकास विद्यापीठ नियमाप्रमाणे स्वत:च्या खर्चातून भरावे लागतील.

४) उपाहारगृहासाठी आवश्यक असलेले फर्निचर, गॅस, भांडी व इतर उपयोगी साहित्य उपाहारगृहसाठी स्वत:चे असल्या बाबतची यादी निविदेसोबत जोडावी.

५) उपाहारगृहातील खाद्यपदार्थ, पदार्थाचे प्रमाणे **(Quality, Quantity, Rate)** दर व दर्जा विद्यापीठाने मान्य केलेले पदार्थ दर, प्रमाण व दर्जा या प्रमाणे पुरविले पाहिजेत. यामध्ये विद्यापीठाच्या पुर्वपरवानगीशिवाय बदल केलेले आढळल्यास करार रद्द करण्याचा अधिकार विद्यापीठास राहील. तसचे भेसळ प्रतिबंधक कायद्यानुसार आवश्यक ती सर्व उपाययोजना कंत्राटदाराने / उपहारगृह चालकाने करावयाची आहे. याबाबतची सर्व जबाबदारी निश्चित केलेल्या उपहारगृह चालकाची असेल.

६) विद्यापीठाने निश्चित केलेल्या उपहारगृहातील चहा, दुध, कॉफी व सर्व खाद्य पदार्थाचे दर परिशिष्ट-"अ"- अ.क्र.२ पान क्र.१० वर नमुद केल्या प्रमाणे आहे. **लिफाफा क्रं.-०२** मध्ये आपण केवळ देणार असणारे मासिक भाडे व सुरक्षा ठेव रक्कम नमुद करावे.

७) दर फलक ऑईल पेंटमध्ये उपहारगृहात लावणे बंधनकारक राहील.

८) उपहारगृहाची इमारत व वापरण्यात येणारे सर्व साहित्य स्वच्छ ठेवण्याची व खाद्यपदार्थ उघड्यावर राहणार नाहीत याची काळजी घेणे ही जबाबदारी लायसेन्सीवर / उपहारगृह चालकाची राहील. त्यासबंधाने विद्यापीठातर्फे उपाहारगृहाची तपासणी वेळोवेळी केली जाईल. तक्रारी प्राप्त झाल्यास करार रद्द केला जाईल.

९) निश्चित केलेल्या उपहारगृहचालकाने प्रचलित नियमांनुसार सर्व प्रकारचे परवाने (लायसेन्सी) संबधीत सरकारी, निमसरकारी अधिका-यांकडून स्वखर्चाने घ्यावयाचे आहेत. तसेच उपहारगृहचालकाने स्वत: धंद्यानुसार देय असणारे सर्व कर मुदतीत भरणे आवश्यक आहेत. तांत्रीक अडचन झाल्यास स्वत:ची जबाबदारी असेल.

१०) उपाहारगृहचालकास शाहकाहारी खाद्यपदार्थाची व्यवस्था ठेवणे बंधनकारक असेल. उपाहारगृह हे अधिकारी, प्राध्यापक, कर्मचारी व विद्यार्थी, अभ्यांगत यांच्यासाठी असेल. तसेच अधिकारी व कर्मचारी यांचे साठी स्वतंत्र व्यचस्था ठेवणे अवश्यक आहे.

११) उपहारगृहचालकास कुटुंबासाठी किंवा स्वत:साठी उपाहारगृहाचा निवासस्थान म्हणून वापर करता येणार नाही.

१२) सर्व प्रचलीत कामगार कायदे, औद्योगीक कायदे पाळण्याचे व त्याची अंमलबजावणी करण्याची जबाबदारी निश्चित केलेल्या उपहारगृहचालकाची राहील. उपहारगृहचालकांनी नेमलेल्या कामगार / कर्मचारी याचा विद्यापीठाकडे कोणताही हक्क, अधिकार व सबंध असणार नाही याची नोंद घ्यावी.

१३) विद्यापीठाशी संबंधीत नसलेल्या व्यक्ती/संस्था याचे कार्यक्रम / समारंभ ईत्यादीसाठी उपहारगृह उपलब्ध करून देता येणार नाही. तसेच बाहेरील कोणत्याही प्रकारच्या कार्यक्रम/ समारंभाच्या ऑर्डर्स स्विकारता येणार नाहीत.

१४) उपाहारगृहचालका मार्फत कुठल्याही निषेध पेयाची/अमली पदार्थांची व तंबाखु, सिगारेट, बीडी, गुटखा , पुडी ईत्यादींची विक्री करता येणार नाही. उपाहारगृहात व विद्यापीठ परिसरात निषेध पेय पुरवीता येणार नाहीत.

१५) उपाहारगृहात रेडीओ, रेकॉर्ड प्लेअर, टि.व्ही./केबल टि.व्ही. इत्यादीचा उपयोग करता येणार नाही.

१६) उपहारगृहचालकास उपाहारगृह चालविण्यासाठी भाडे तत्वार देण्यात येईल. उपाहारगृहाचे एक महिन्याचे आगाऊ भाडे भरावे लागतील. उपहारगृहचालकाने महिन्याच्या ५ तारखेपर्यंत भाडे जमा करणे आवश्यक आहे.

१७) उपाहारगृहचालकास उपहारगृहासाठी सुरक्षा ठेव विद्यापीठाच्या लेखा विभागात रोखीने भरावी लागेल. ही रक्कम कराराचा कालावधी संपुष्टात आल्यानंतर परत केल्या जाईल व या रक्कमेवर व्याज देय होणार नाही.

१८) निविदाधारकांची अनामत रक्कम ही निवड झालेल्या निविदाधारकासोबत करार केल्यानंतर परत केल्या जाईल. सदर अनामत रक्कमेवर व्याज देय होणार नाही.

१९) विद्यापीठ कराराचा कालावधी संपण्यापुर्वी उपाहारगृहचालकास रीतसर एक महिन्याची नोटीस देवून करार संपूष्टात आणण्याचा अधिकार विद्यापीठ राखून ठेवत आहे.

२०) उपाहारगृह चालविण्याकरिता ज्या व्यक्तीच्या/फर्मच्या नावे विद्यापीठाशी करार होईल त्याच व्यक्तीने/फर्मने उपाहारगृह चालविणे बंधनकारक असून इतरांना उपाहारगृह पोटगुत्तेदारी पध्दतीने चालविण्यास देता येणार नाही.

२१) परिशिष्ट ''अ'' मध्ये विद्यापीठाला आवश्यक असलेली माहिती व कागदपत्रे निविदा पुस्तिकेसोबत निविदा दाखल करतांना जोडावीत.

२२) कोणतीही निविदा मंजूर अथवा नामंजूर करण्याचा अधिकार विद्यापीठाने राखून ठेवला आहे. तसेच निविदा स्वीकारणे/ उघडणे बाबतच्या तारखा बाबत विद्यापीठ प्रशासनाचा निर्णय अंतिम असेल.

२३) विद्यापीठ कार्यालयातर्फे संपन्न होणा-या बैठकीसाठी लागणारे खाद्यपदार्थ चहा, कॉफी आणि शितपेय हे पुर्वसूचनेनुसार पुरवठा करणे बंधनकारक असेल. याचा दर्जा योग्य नाही असे विद्यापीठ प्रशासनाच्या निदर्शनास आल्यास देयक अदा केले जाणार नाही व या बाबतचा विद्यापीठ प्रशासनाचा पुढील निर्णय हा अंतिम राहील.

२४) निश्चीत केलेल्या निविदाधारकाने रू.५००/- बॉण्ड पेपरवर विद्यापीठाशी करार करणे आवश्यक आहे.

२५) जर कराराचा भंग केला असेल किंवा करीत असेल तर उपाहारगृहचालका विरूध्द कायदेशीर / पोलीस कारवाई करण्यात येईल.

२६) विषबाधा सारखे प्रकार झाल्यास उपहारगृह चालका विरुद्ध कार्यवाही करण्याचा अधिकार विद्यापीठास असेल.

**२७) बालकामगार कायद्यानुसार उपहारगृहामध्ये कामासाठी लावता येनार नाहीत.**

**२८) उपहारगृहात काम करण-या सर्व कर्मचा-यांना कमीत कमी दोन गणवेश असणे आवश्यक आहेत. गणवेश स्वच्छ धूतलेले व इस्त्री करुन घालणे बंधनकारक आहे.**

**२९) उपहारगृहातील तसेच संस्थेतील कोण्यत्याही संपत्तीला नुकसान पोहचनार नाही याची दक्षता कंत्राटदाराने घ्यावी.**

**३०) तांत्रीक काणामुळे उपहारगृहबंद करण्याचा निर्णय विद्यापीठाने घेतल्यास तो आपल्यावर बंधनकारक राहील व या बाबत कोण्यत्याही प्रकारचा वाद कंत्राटदारास करता येणार नाही व उपहारगृह स्वखर्चाने रिकामे करुन द्यावे लागेल.**

**३१) उपहारगृहचालवित असतांना कामगारास किंवा ग्राहकास कोणतीही आपत्ती जसे आग, विज, अथवा कोणत्याही प्रकारची नैसर्गिक आपत्ती वा आपघात झाल्यास त्यास विद्यापीठ जबाबदार राहणार नाही. त्यासाठी कंत्राटदाराने स्व:खर्चाने व्यावसायाचा विमा उतरवून घेतील त्यासाठी विद्यापीठ जबाबदार राहनार नाही.**

**३२) इतर मान्यता प्राप्त शित पेय, चॉकलेट, बिस्कीट असे पदार्थ एम. आर. पी. वरच विकणे बंधनकारक असेल.**

३३) निविदे संबधित वाद फक्त नांदेड न्यायलयांतर्गत सोडविला जाईल.(Subject to Nanded Jurisdiction)

३४) खालील तक्त्याप्रमाणे गुण देण्यात येणार आहेत व त्याप्रमाणे जास्त गुण प्राप्त करणा-या कंत्राटदारास उपहारगृह चालविण्याबाबत आदेश निर्गमित करण्यात येईल –

| Sr.No. | Particular | Marks |
|---|---|---|
| 01 | **Documents Available**<br>a) Shop Act<br>b) License food act and standard act<br>c) GST if available<br>d) Pan Card | 04<br>04<br>01<br>01 |
| 02 | **Experience Criteria** | 10 |
| 03 | **Canteen Rent** | 20 |
| 04 | **Canteen Security Deposit** | 10 |

**Marking Scheme For Rent, Deposite & Experience**

| Rent (Out of 20) | |
|---|---|
| 13000 (Above) | 20 |
| 13000 | 16 |
| 12000 | 14 |
| 11000 | 12 |
| 10000 | 10 |
| 9000 | 08 |
| 8000 | 06 |
| 7000 | 04 |
| 6000 | 02 |
| 5000 (Below) | 00 |

| Deposite (Out of 10) | |
|---|---|
| 120000 (Above) | 10 |
| 120000 | 08 |
| 110000 | 07 |
| 100000 | 06 |
| 90000 | 05 |
| 80000 | 04 |
| 70000 | 03 |
| 60000 | 02 |
| 50000 | 01 |
| 50000 (Below) | 00 |

| Experience (Years) | |
|---|---|
| 10 (Above) | 10 |
| 9-10 | 09 |
| 8-9 | 08 |
| 7-8 | 07 |
| 6-7 | 06 |
| 5-6 | 05 |
| 4-5 | 04 |
| 3-4 | 03 |
| 2-3 | 02 |
| 1-2 | 01 |

कुलसचिव
स्वामी रामानंद तीर्थ
मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

वर्ष २०२५-२०२७ करिता विद्यापीठ परिसरातील प्रशासकीय इमारती समोरील जीण्या खाली उपहारगृह भाडे तत्वावर चालविणे बाबत

निविदा क्र.संपदा/प्र.इ.उपहारगृह/टी-०१-२०२५

## घोषणापत्र आणि निविदाधारकांचा संपर्कासाठी पत्ता

सदर निविदेतील दिलेल्या सर्व अटी व शर्ती आणि सुचना मी वाचल्या असून, त्या मला मान्य आहेत. संपर्कासाठी माझा पत्ता, फॅक्स क्रमांक, ई-मेल व दुरध्वनी क्रमांक निविदेत दिला आहे.

१) नाव व संपूर्ण पत्ता : ---------------------------------------------

---------------------------------------------

---------------------------------------------

०२) एस.टी.डी. दुरध्वनी क्रमांक

( ) ( ) कार्यालय

( ) ( ) निवास

( ) भ्रमणध्वणी क्रमांक

ई-मेल :

निविदाधारकाची स्वाक्षरी व शिक्का

**वर्ष २०२५ -२७ करिता विद्यापीठ परिसरातील प्रशासकीय इमारती समोरील जीण्या खालील उपहारगृह भाडे तत्वावर चालविणे बाबत**

**निविदा क्र.संपदा/प्र.इ.उपहारगृह/टी-०१-२०२५**

## परिशिष्ट "अ"

निविदाधारकांनी खालील माहिती भरावी : -

१) अ) विद्यापीठाने देवू केलेल्या **प्रशासकीय इमारती समोरील जीण्या खालील** उपाहारगृहा करीता किमान **रु ५,०००/-** (पाच हजार फक्त) प्रति माह ठरविलेल्या किमान भाडे या पेक्षा किती भाडे द्याल. : ...............................................

ब) विद्यापीठाने ठरवुन दिलेली सुरक्षा ठेव **रु.(५०,०००/- ( पंन्नास हजार रुपये केवळ)** या पेक्षा किती सुरक्षा ठेव द्याल. : ...............................................

२) निविदाधारकासाठी सर्व साधारण नियम व अटी मध्ये अ.क्र.६ नुसार निश्चीत केलेले खाद्यपदार्थाचे दर(सर्व करासह) खालील प्रमाणे आहेत.

| अ. क्र. | खाद्य पदार्थाचे नांव | विद्यापीठाने ठरविलेल्या दर (सर्व करासह) |
|---|---|---|
| १ | चहा (हाफ) | रु.५/- |
| २ | कॉफी / दुध (हाफ) | रु.८/- |
| ३ | पोह/ उपमा / खिचडी - १०० ग्राम | रु.२०/- |
| ४ | वडा पाव- २ नग | रु.२०/- |
| ५ | पाव भाजी - पाव २ नग आणि भाजी १ प्लेट | रु.३०/- |
| ६ | मिसळ पाव - मिसळ-१०० ग्राम आणि पाव २ नग | रु.३०/- |
| ७ | पुरी भाजी - पुरी ४ नग आणि भाजी १ प्लेट | रु.२५/- |
| ८ | इडली - ४ नग | रु.३०/- |
| ९ | इडली वडा (इडली-३ नग आणि वडा १ नग) | रु.३५/- |
| १० | शिरा - १०० ग्राम | रु.२०/- |
| ११ | गुलाब जामुन - १०० ग्प्रम | रु.२०/- |
| १२ | साबुदाना खिचडी - १ प्लेट | रु.२५/- |
| १३ | समोसा /कचोरी २ नग | रु.२५/- |
| १४ | जिलेबी-१०० ग्राम | रु.१४/- |
| १५ | बुंदीचा लाडू -१०० ग्रा- १ नग | रु.१४/- |

| | | |
|---|---|---|
| १६ | **भोजन थाळी:**<br>(गव्हाच्या पोळया, भात, वरण, पातळभाजी/उसळ,<br>कोरडी भाजी, **चटणी/लोणचे** (मर्यादित), लिंबू/कांदा) | रु.६०/- |
| १७ | **भोजन थाळी (१०० व त्यापेक्षा ज्यास्त):**<br>(गव्हाच्या पोळया, भात, वरण, पातळभाजी/उसळ,<br>कोरडी भाजी, **चटणी/लोणचे** (मर्यादित), लिंबू/कांदा) | रु.५०/- |
| १८ | **भोजन थाळी (फुल जेवण) :**<br>(गव्हाच्या पोळया, भात, वरण, पातळभाजी/उसळ,<br>कोरडी भाजी, **चटणी/लोणचे** (मर्यादित), लिंबू/कांदा) | रु.१००/- |
| १९ | **भोजन थाळी (फुल जेवण) (१०० व त्यापेक्षा ज्यास्त) :**<br>(गव्हाच्या पोळया, भात, वरण, पातळभाजी/उसळ,<br>कोरडी भाजी, **चटणी/लोणचे** (मर्यादित), लिंबू/कांदा) | रु.९०/- |
| २० | **विशेष थाळी:**<br>**चपाती/फुलके/तंदुर, भात,वरण, दोन भाज्या, एक स्विट, सलॉड, पापड, लोणचे,भजे, मठ्ठा, कोशिबीर, टेचा, उसळ इत्यादी.** | रु.१६०/- |
| २१ | **विशेष थाळी (१०० व त्यापेक्षा ज्यास्त):**<br>**चपाती/फुलके/तंदुर, भात,वरण, दोन भाज्या, एक स्विट, सलॉड, पापड, लोणचे,भजे, मठ्ठा, कोशिबीर, टेचा, उसळ इत्यादी.** | रु.१५०/- |

**निविदाधारकाचे नाव, स्वाक्षरी व शिक्का**